**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 16/09/2025

**आरोपी लोकसेवक** - 1) श्री मधुकर आसाराम थोरात, वय 50 वर्ष ,पद. ग्राम महसूल अधिकारी (वर्ग 3) नेमणूक, तलाठी सजा कार्यालय सातारा ,ता.जि. छत्रपती संभाजीनगर.

**आरोपी खाजगी इसम** 2) श्री कैलास प्रभाकर साळुंखे, वय 39 वर्ष खाजगी इसम रा. गोलटगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या प्लॉटच्या सात बारावर तक्रारदार यांचे नावाचा फेर घेण्याकरीता 7000/- (सात हजार) रुपये लाच मागणी करुन तडजोडी अंती 5,000/- (पाच हजार) रुपये लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक व आरोपी खाजगी ईसम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सातारा, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी लोकसेवक** - श्री मधुकर आसाराम थोरात, वय 50 वर्ष ,पद. ग्राम महसूल अधिकारी (वर्ग 3) नेमणूक, तलाठी सजा कार्यालय सातारा ,ता.जि. छत्रपती संभाजीनगर, रा. कळकी, ता. कन्नड . जि, छत्रपती संभाजी नगर.<br><br>**आरोपी खाजगी ईसम** :- श्री कैलास प्रभाकर साळुंखे, वय 39 वर्ष खाजगी इसम रा. गोलटगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 7,000/- (सात हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 5,000/- ( पाच हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. योगेश शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे मौजे सातारा गट नंबर 106 मधील प्लॉट 6 बी माहे मार्च 2025 मध्ये खरेदी केला होता. सदर प्लॉट ची फेरफार घेऊन सात बाऱ्यावर स्वतःच्या नावे नोंद होण्यासाठी तक्रारदार यांनी सजा सातारा ग्राम महसूल कार्यालय येथे दिनांक 21/08/2025 रोजी अर्ज दिला होता. सदर ठिकाणी आलोसे ग्राम महसूल अधिकारी आणि खाजगी इसम यांनी तक्रारदार यांच्या कडे शासकीय काम करून देण्यासाठी पैशाची मागणी केली होती |
| थोडक्यात माहिती | दिनांक 16/09/2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष आलोसे श्री थोरात आणि खाजगी इसम साळुंखे यांच्याकडे तक्रारदारास पाठवून पडताळणी केली असता आलोसे ग्राम महसूल अधिकारी थोरात आणि खाजगी इसम साळुंखे यांनी तक्रारदार यांच्या कडे प्लॉट ची फेरफार घेऊन सात बाऱ्यावर तक्रारदार यांचे नाव नोंद करण्यासाठी 7000/-(सात हजार) रुपयांची लाच मागणी करुन तडजोडी अंती 5000/- (पाच हजार) रुपये स्वीकारण्याचे कबूल केले.<br>लाचमागणी नंतर दिनांक 16/09/2025 रोजी आलोसे ग्राम महसूल अधिकारी थोरात आणि खाजगी इसम साळुंखे यांच्या लाच मागणी पडताळणी नंतर दिनांक 16/09/2025 रोजी शासकीय पंच समक्ष सजा ग्राम महसूल अधिकारी कार्यालय, सातारा, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी सापळा कारवाई आजमावली असता आलोसे ग्राम महसूल अधिकारी थोरात यांनी तक्रारदार यांच्या कडून प्लॉट ची फेरफार घेऊन सात बाऱ्यावर नाव नोंद करण्यासाठी 5000/-(पाच हजार) रुपये शासकीय पंच समक्ष कार मध्ये स्वीकारले असता आलोसे ग्राम महसूल अधिकारी थोरात आणि खाजगी इसम साळुंखे यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्यात आली आहे. तसेच आलोसे व आरोपी खाजगी ईसम यांच्या विरुध्द पोलीस ठाणे सातारा, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशीकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री. योगेश शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक, श्री.वाल्मीक कोरे, पोलीस हवलदार राजेंद्र जोशी, पोलीस अंमलदार प्रकाश डोंगरदिवे, अन्वेज शेख यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

पोलीस अधीक्षक :- 90110 92777

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205


पोलीस उप अधीक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

सुरेश ई. नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर
16/9/2025